पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 13/01/2020 (सोमवार)
(दुपार)

---

## दुखापत

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 13 कि. मी अंतरावर मौजा ईसापुर येथे दिनांक 11/01/2020 चे 17:00 वा. ते 17:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– हरीचंद चरणलाल वाघमारे, वय 48 वर्ष, रा. इसापुर हे नविन घराचे बांधकाम करीत असतांना आरोपी नामे– गोलु अन्नाजी ढेपे, रा. ईसापुर हा तिथे आला व फिर्यादीस म्हणाला की, ‘‘तु माझ्या बहीणीचे लग्न तोडले.’’ यानंतर आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून हातबुक्याने मारहाण केले. यानंतर फिर्यादी घाबरून त्यांच्या राहत्या घरी जाउन लपले. यानंतर आरोपीने फिर्यादीचा पाठलाग करून फिर्यादीच्या राहत्या घरी प्रवेश करून तिथे ठेवलेली प्लॅस्टर करण्याची ॲल्युमिनीअम ची बॉटम उचलुन फिर्यादीचे हातावर, पायावर, पसलीवर मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 325, 452, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार श्री. नामदेव धांडे हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर